सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४६५/४९२/४७५
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक: तंशिसं/पदविका प्रवेश/२०२५/ प्रवेशाचा अंतिम दिनांक सुधारित /४१६ दिनांक : ०४/०९/२०२५

**शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता प्रवेशासाठीचा सुधारित अंतिम दिनांक**

**प्रथम वर्ष पोस्ट एसएससी (दहावी नंतरचे) पदविका अभियांत्रिकी व तंत्रज्ञान / वास्तुकला अभ्यासक्रम, प्रथम वर्ष पोस्ट एचएससी (बारावी नंतरचे) पदविका हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान व सरफेस कोटींग तंत्रज्ञान अभ्यासक्रम आणि थेट द्वितीय वर्ष पदविका अभ्यासक्रम**

संदर्भ: तंत्रशिक्षण संचालनालयाचे वेळापत्रक क्रमांक:-

१. तंशिसं/पदविका प्रवेश/दहावी नंतरचे प्रथम वर्ष /२०२५/ प्रवेशाचा अंतिम दिनांक सुधारित /३६९, दिनांक : १२/०८/२०२५
२. तंशिसं/पदविका प्रवेश/बारावी-एचएमसीटी एससीटी /२०२५/ प्रवेशाचा अंतिम दिनांक सुधारित /३७०, दिनांक : १२/०८/२०२५
३. तंशिसं/पदविका प्रवेश/थेट द्वितीय वर्ष /२०२५/ प्रवेशाचा अंतिम दिनांक सुधारित /३७१, दिनांक : १२/०८/२०२५

---

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता पुर्णवेळ पोस्ट एसएससी (दहावी नंतरचे) पदविका अभियांत्रिकी व तंत्रज्ञान / वास्तुकला अभ्यासक्रम तसेच प्रथम वर्ष पोस्ट एचएससी (बारावी नंतरचे) पदविका हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान व सरफेस कोटींग तंत्रज्ञान अभ्यासक्रम तसेच बारावी व आयटीआय नंतरचे थेट द्वितीय वर्ष पदविका अभ्यासक्रम या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी संदर्भ १ ते ३ नुसार प्रवेशाचे वेळापत्रक घोषित केले आहे. त्यानुसार पूर्ण शुल्क परताव्यासह प्रवेश रद्द करण्याच्या अंतिम दिनांकांनतर रिक्त राहिलेल्या जागांसाठी संस्थास्तरिय प्रवेश प्रक्रिया दिनांक ३०.०८.२०२५ पासुन सुरु झालेली असुन त्यासाठीचा अंतिम दिनांक ०४.०९.२०२५ घोषित केलेला आहे. आता या प्रवेशासाठी सदरचा अंतिम दिनांक सुधारित करण्यात येत असुन तो दि. १५.०९.२०२५ असा करण्यात येत आहे. यासाठीच्या संस्थास्तरिय प्रवेश प्रक्रिया संस्थेद्वारे घोषित वेळापत्रकानुसार पार पाडण्यात येतील.

तसेच संदर्भीय १ ते ३ नुसार घोषित पदविका अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीच्या सर्व प्रकारच्या प्रवेशांसाठीचा अंतिम दिनांक १५.०९.२०२५ व संस्थांसाठी डेटा अपलोड करण्याचा (प्रवेशीत झालेल्या उमेदवारांचा तपशील) शेवटचा दिनांक १५.०९.२०२५ असा सुधारित करण्यात येत आहे, याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य